# आपल्या अधिकारांचे स्पष्टीकरण

जर आपल्याला युरोपियन अटक वॉरंट किंवा एपीबी (ऑल पोर्ट्स बुलेटिन) अंतर्गत **स्थानबद्ध** केलेले असेल.



## मुलाखतीस सुरवात करण्यापूर्वी आपल्या कोणत्या अधिकारांबाबत सांगितले गेले पाहिजे?

### 1. मुलाखती दरम्यान वकीलासोबत गोपनीय सल्ला-मसलत करण्याचा व कायदेशीर मदतीचा हक्क

A. वकील

— आपण आपल्या पसंतीच्या वकीलाला संपर्क करण्यास सांगू शकता.
— जर आपल्याजवळ आपला स्वत:चा वकील नसेल किंवा तो वकील उपस्थित राहू शकत नसेल तर आपण बार असोसिएशनच्या पूल ऑफ ड्यूटी वकीलांपैकी कुणाशी संपर्क साधायला सांगू शकता.
— जर आपण काही विशिष्ट कायदेशीर अटींचे पालन केले तर ही कायदेशीर मदत संपूर्णपणे किंवा आंशिकरित्या मोफत असेल. कायदेशीर मदतीकरीता असणाऱ्या अटी जाणून घेण्याकरीता आपण संबंधित फॉर्म मागू शकता.

B. आधीची गोपनीय सल्ला-मसलत

— पुढील मुलाखतीपूर्वी - आणि बार असोसिएशनच्या पूल ऑफ ड्यूटी वकीलाशी बोलल्यानंतर 2 तासामध्ये - आपण आपल्या वकीलाशी तीस मिनिटापर्यंत गोपनीय सल्ला-मसलत करण्यास पात्र असता, जी मुलाखतकर्त्याच्या निर्णयानुसार अपवादात्मक स्थितीमध्ये वाढवल्या जाऊ शकते.
— ही सल्ला-मसलत टेलिफोन आणि मुलाखतीच्या जागी अशा दोन्ही ठिकाणी होऊ शकते.
— जर आपल्या वकीलाशी नियोजित सल्ला-मसलत 2 तासांमध्ये होऊ शकली नाही, तरीसुद्धा बार असोसिएशनच्या पूल ऑफ ड्यूटी वकीलांशी टेलिफोनवर गोपनीय सल्ला-मसलत होईल. त्यानंतर, मुलाखत सुरू होऊ शकते.
— जर आपले वकील मुलाखतीदरम्यान उपस्थित झाले तर ते उर्वरित मुलाखतीमध्ये हजर राहू शकतील.

C. मुलाखतीदरम्यान कायदेशीर मदत

— मुलाखतीदरम्यान आपण आपल्या वकीलाची मदत घेण्यास पात्र आहात.
— आपले वकील खालील बाबींची खात्री करतील:
  - मौन राहण्याच्या आपल्या अधिकाराचे आणि गुन्ह्यात गोवले न जाण्याच्या अधिकाराचे पालन होत आहे,
  - मुलाखतीदरम्यान आपल्याशी कसा व्यवहार होत आहे, आपल्यावर कसलाही अयोग्य दबाव तर आणला जात नाही आहे,
  - आपले अधिकार आणि मुलाखतीची नियमितता आपल्यावर स्पष्ट करण्यात आली आहे.

जर आपल्या वकीलाला यापैकी कुठल्याही विषयावर टिप्पणी करायची असेल तर तो ती लगेच पोलिस मुलाखत निवेदनामध्ये नोंद करू शकतो.
आपले वकील विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांविषयी स्पष्टीकरण विचारू शकतात.त्यांना आपल्याऐवजी उत्तर देण्याची किंवा मुलाखतीस अडथळा आणण्याची परवानगी नाही.

— आपल्याला किंवा आपल्या वकीलांना अतिरिक्त गोपनीय सल्ला-मसलत करण्यासाठी फक्त एकदा मुलाखत स्थगित करण्याचा अधिकार आहे.
जर मुलाखतीदरम्यान नवीन तथ्ये किंवा गुन्हे उघडकीस आल्यास आपल्याला आपल्या वकीलांसोबत अतिरिक्त गोपनीय सल्ला-मसलत करण्याची परवानगी आहे. ही सल्ला-मसलत 15 मिनिटांपेक्षा अधिक काळ चालू शकणार नाही.

D. सवलत

वकीलाशी सल्ला-मसलत करण्याची विनंती करणे किंवा वकीलाची मदत घेणे आपल्यावर बंधनकारक नाही.

आपण स्वेच्छेने आणि गंभीरपणे विचार करून हा अधिकार सोडू शकता, जर आपण:
— वयाने सज्ञान असाल,
— आपण या अर्थाच्या दस्तऐवजावर स्वाक्षरी करून त्यावर दिनांक नमूद केला असेल.
— शक्य असल्यास, या मुलाखतीचे दृक-श्राव्य चित्रण केले जाऊ शकते. आपण याविषयी आपल्या वकीलांशी चर्चा करू शकता (सोबतच मुद्दा 7 बघा).

या समस्येवर, आपण बार असोसिएशनच्या ड्युटी वकील च्या पूल येथील एखाद्याशी फोनवर बोलू शकता.

E. अपवाद

काही अपवादात्मक परिस्थितींमध्ये किंवा काही अपरिहार्य कारणांच्या आधारे, सरकारी वकील किंवा तपास करणारे दंडाधिकारी मुलाखतीच्या दरम्यान आपल्याला वकीलाशी आगाऊ गोपनीय सल्ला-मसलत करण्याचा किंवा मदत घेण्याचा अधिकार न देण्याचा निर्णय घेऊ शकतात. त्यांना या निर्णयाचे कारण सांगणे आवश्यक आहे.

F. युरोपियन अटक वॉरंट बजावणाऱ्या देशामध्ये वकीलाचे अधिकार

युरोपियन अटक वॉरंट बजावणाऱ्या देशामध्ये वकीलाची नेमणूक करण्याचा आपल्याला अधिकार आहे. हे वकील कदाचित बेल्जियम मधील आपल्या वकीलांना प्रत्यार्पण प्रक्रियेसंदर्भात माहिती आणि सल्ला प्रदान करू शकतात.

## 2. युरोपियन अटक वॉरंट किंवा एपीबी संदर्भात माहिती

— युरोपियन अटक वॉरंट किंवा एपीबी संदर्भात महत्वाच्या बाबींची माहिती मिळवण्याचा आपल्याला अधिकार आहे.

— दंडात्मक कार्रवाईची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जर आपले प्रत्यार्पण केले जात असेल आणि आपल्याला या आरोपाची किंवा प्रलंबित फौजदारी कार्यवाहीची माहिती नसेल तर आपण आपल्या माहितीकरीता विदेशी आरोपपत्राची प्रत मिळण्याची विनंती करू शकता आणि याची व्यवस्था वेळेत केली जाण्याची विनंती करू शकता.

## 3. मौन राहण्याचा अधिकार

— कुठल्याही परिस्थितीमध्ये स्वत:ला गुन्ह्यात गोवून घेण्याकरीता आपल्यावर बळजबरी करता येणार नाही.
— आपण आपली ओळख सांगितल्यानंतर, आपण स्टेटमेंट देण्याचे, विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्याचे किंवा मौन राहण्याचे निवडू शकता.

## 4. आपल्याला अटक झालेली आहे हे कुणाला तरी सांगणे

आपल्या अटकेबद्दल तिसऱ्या व्यक्तीला कळवण्याचा अधिकार आपल्याला आहे.

तथापि, तपासाचे हित लक्षात घेता अपरिहार्य कारणांच्या आधारे सरकारी वकील  तपास करणारे दंडाधिकारी हा भाग आवश्यक तोपर्यंत पुढे ढकलू शकतात.

## 5. वैद्यकीय मदत

— गरज भासल्यास मोफत वैद्यकीय मदत मिळण्याचा अधिकार आपल्याला आहे.
— आपण आपल्या पसंतीच्या डॉक्टरांकडून तपासणी करवून घ्यायची आहे असे सांगू शकता. असे असल्यास, याचा खर्च आपल्याला करावा लागेल.

## मुलाखतीदरम्यान आपले अतिरिक्त अधिकार काय आहेत?

### 6. मुलाखती दरम्यान अतिरिक्त अधिकार

मुलाखतीची सुरवातच बऱ्याच संभाषणांनी व्हायला हवी. गुन्ह्यांबाबत पुन्हा संक्षिप्त माहिती आणि मौन राहण्याच्या आपल्या अधिकाराची माहिती देण्यासोबतच आपल्याला खालील बाबी सुद्धा सांगण्यात येतील:

— आपण अशी विनंती करू शकता की जे काही प्रश्ने विचारले जातील आणि आपण दिलेली संपूर्ण उत्तरे आपल्याच शब्दांत जशीच्या तशी रेकॉर्ड केली जावी,
— आपण विशिष्ट विचारपूस करण्यास किंवा विशिष्ट व्यक्तीला मुलाखत घेण्यास सांगू शकता,
— न्यायालयामध्ये आपल्या स्टेटमेंटला पुराव्याच्या स्वरूपात वापरले जाते. मुलाखतीदरम्यान, आपण आपल्या ताब्यातील दस्तऐवजांचा वापर करू शकता, जर यामुळे मुलाखत घेण्यास उशीर होत नसेल तर. आपण मुलाखतीदरम्यान किंवा त्यानंतर या कागदपत्रांना पोलिस मुलाखत निवेदनामध्ये जोडण्यास किंवा न्यायालयीन कचेरीमध्ये जमा करण्यास सांगू शकता.

### 7. मुलाखतीचे चित्रण

— शक्य असल्यास, मुलाखतीच्या कार्यवाहीचे निरीक्षण करण्याकरीता मुलाखतीचे चित्रण केले जाऊ शकते.
— याचा निर्णय मुलाखतकर्ता, सरकारी वकील किंवा तपास करणारे दंडाधिकारी घेतला जातो.

### 8. मुलाखतीच्या शेवटी

मुलाखतीच्या शेवटी मुलाखतीचा मजकूर आपणास वाचायला दिला जाईल.तोआपल्याला वाचून दाखवण्यासही आपण सांगू शकता.

असे काही आहे जे आपल्याला बदलायचे आहे किंवा काही जोडायचे आहे का असेही आपल्याला विचारले जाईल.

### 9. दुभाषीची मदत

— जर आपण भाषा समजू किंवा बोलू शकत नसाल किंवा आपल्याला ऐकण्यास किंवा बोलण्यास समस्या येत असेल आणि आपले वकील आपली भाषा समजू किंवा बोलू शकत नसतील तर आपल्या वकीलांसोबत गोपनीय सल्ला-मसलतीदरम्यान एका अधिकृत दुभाषीची मदत घेण्यास आपण पात्र आहात. ही मदत मोफत आहे.
— जर कार्यवाहीच्या भाषेव्यतिरिक्त आपल्याला दुसऱ्या भाषेमध्ये बोलायचे असल्यास मुलाखतीदरम्यान आपल्या मदतीसाठी एका अधिकृत दुभाषीला बोलवण्यात येईल. ही मदत मोफत आहे.
— आपल्याला आपल्या भाषेमध्ये स्वत:चे स्टेटमेंट लिहिण्यास सांगितले जाऊ शकते.

### 10. प्रत्यार्पणासाठी संमती

ज्या देशाला आपण हवे आहात त्याच्याकडे प्रत्यार्पण होण्यास आपण संमत असणे कदाचित गरजेचे असेल. युरोपियन अटक वॉरंट मध्ये निर्दिष्ट गुन्ह्यांकरीता आपण आपली संमती मर्यादित ठेऊ शकता. आपण विशेष नियमातही सवलत देऊ शकता, याचा अर्थ असा होतो की

# आपल्या अधिकारांचे स्पष्टीकरण

जर आपल्याला युरोपियन अटक वॉरंट किंवा एपीबी (ऑल पोर्ट्स बुलेटिन) अंतर्गत **स्थानबद्ध** केलेले असेल.



आपले प्रत्यार्पण झाल्यानंतर ज्या गुन्ह्यांकरीता प्रत्यार्पणाचा अर्ज करण्यात आला होता त्याव्यतिरिक्त इतर गुन्ह्यांकरीता देण्यात आलेल्या शिक्षेचा भाग म्हणून सुद्धा आपल्यावर खटला चालवता येतो किंवा तुरूंगवास ठोठावता येतो.

तपास करणाऱ्या दंडाधिकाऱ्यांनी आपली मुलाखत घेतल्यानंतर जर आपण प्रत्यार्पण केले जाण्यास सहमत असाल तर सरकारी वकील आपली मुलाखत घेतील. सरकारी वकील आपल्याला परिणामांची कल्पना देतील. आपण आपल्या वकीलांची मदतही घेऊ शकता. आपण फक्त सरकारी वकीलांसमोरही प्रत्यार्पणाला संमती देऊ शकता.

आपण एकवेळा कायदेशीररित्या प्रत्यार्पण केले जाण्यास संमती दिली तर आपण प्रत्यार्पणाचा निर्णय बदलू शकणार नाही.

# आपल्या अधिकारांचे स्पष्टीकरण

जर आपल्याला युरोपियन अटक वॉरंट किंवा एपीबी (ऑल पोर्ट्स बुलेटिन) अंतर्गत **स्थानबद्ध** केलेले असेल.



## आपल्याला किती काळ कैदेत ठेवले जाऊ शकते?

### 1. 48 **तास**

आपल्याला जास्तीत जास्त 48 तास कैदेत ठेवले जाऊ शकते.

### 2. तपास करणारा दंडाधिकारी

— 48 तासांच्या आत आपली एकतर सुटका केली जाईल किंवा आपल्याला तपास करणाऱ्या दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले जाईल. युरोपिअन अटक वॉरंटच्या अंतर्गत आपली स्थानबद्धता चालू ठेवायची किंवा नाही याचा निर्णय ते घेतील.

— तपास करणाऱ्या दंडाधिकाऱ्याला प्रथम प्रकरणाविषयी आपले म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक आहे. आपण आपल्या वकीलाची मदत घेण्यास पात्र आहात. संभाव्य कस्टडीविषयी आपले किंवा आपल्या वकीलाचे म्हणणे तपास करणाऱ्या दंडाधिकाऱ्याला ऐकावे लागेल.

जर आपण सज्ञान वयाचे असाल तर वकीलाची मदत घेण्याचा आपला अधिकार आपण सोडू शकता.

— तपास करणाऱ्या दंडाधिकाऱ्याने जर आपल्या अटकेसाठी वॉरंट जारी केल्यास आपल्याला खालील अधिकार असतील:

- आपण कुठल्याही मर्यादेशिवाय आपल्या वकीलाशी बोलण्यास मुक्त असाल.
- आपली अटक झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत आपल्याला सत्र न्यायालयामध्ये हजर केले जाईल, जेथे आपण आपल्या कस्टडीला आणि युरोपियन अटक वॉरंट अंतर्गत प्रत्यार्पणाला आव्हान देऊ शकता. आपण या निर्णयावर अभियोग न्यायालयामध्ये अपील करू शकता, ज्याला त्यावर पंधरा दिवसांचे आत निर्णय द्यावा लागेल. सत्र न्यायालयाच्या निर्णयाची आपल्यावर अंमलबजावणी करण्यात आल्यावर चोवीस तासांच्या आत अपील सादर केली पाहिजे.
- सत्र न्यायालयाच्या किंवा अभियोग न्यायालयाच्या सुनावणीच्या एक दिवस आधी आपल्याला आपल्या केस फाइल विषयी सल्ला-मसलत करण्याची परवानगी असेल.
- आपले वकील या प्रक्रियेच्या अंमलबजावणीचा पुढील भाग विस्तृत स्वरूपात समजावून सांगू शकतील.
- जर आपण बेल्जियमचे नागरिक नसाल तर आपण आपल्या दूतावासाच्या अधिकाऱ्यांना आपल्या अटकेबद्दल कळवू शकता.
- जर आपल्याला युरोपियन अटक वॉरंटची भाषा किंवा त्याचे ज्या भाषेमध्ये भाषांतर केले आहे ती भाषा समजत नसेल तर आपल्याला जी भाषा समजते त्यामध्ये युरोपियन अटक वॉरंटचे लिखित भाषांतर पुरवले जाईल किंवा युरोपियन अटक वॉरंटचे शाब्दिक भाषांतर किंवा कार्यवाहीच्या महत्वाच्या नोंदींचे शाब्दिक भाषांतर पुरवले जाईल व हे सर्व आपल्याला सत्र न्यायालयासमोर हजर करण्यापूर्वी केले जाईल आणि त्यानंतर अंतिम निर्णयाची अंमलबजावणी केली जाण्यापूर्वी केले जाईल.

**आपल्या अधिकारांचे हे स्पष्टीकरण आपण आपल्याजवळ ठेऊ शकता.**